# अधिसूचना

क्रमांक : ७०/२०२२ दिनांक : १८-०६-२०२२

**विषय :- महाविद्यालये बंद करण्याबाबत.. २०२१-२०२२**

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता सूचित करण्यात येते की, खालील महाविद्यालये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित होऊन अनेक वर्षे झालेली आहेत. या महाविद्यालयात आजपर्यंत एकही शिक्षकांची जागा भरण्यात आली नाही, प्राचार्यांची नेमणूक सुध्दा करण्यात आलेली नाही, अनेक वर्षापासून संलग्नीकरणाचे अर्ज व शुल्क भरलेले नाही, या कारणाने महाविद्यालयाचे संलग्निकरण खंडित झालेले आहे.

अधिष्ठाता मंडळाच्या निर्णयानुसार खालील तक्त्यातील महाविद्यालयाचे संलग्नीकरण काढून घेण्याबाबत संस्थेचे अध्यक्ष/सचिव व महाविद्यालयाला विद्यापीठ पत्र क्र.संगाबाअवि/८/सी-१००५/२०१९, दि.२३.०५.२०१९ द्वारे नोंदणीकृत डाकेने कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली होती व नोटीसवर स्पष्टीकरण सादर करण्यास एक महिन्याचा अवधी देण्यात आलेला होता. त्यावर तक्त्यातील क्र.१ व ३ मधील संस्थेकडून उत्तर प्राप्त झालेले नाही. तसेच क्र.२ वरील संस्थेकडून प्राप्त झालेले उत्तर अधिष्ठाता मंडळाच्या दि.३.८.२०१९ रोजी झालेल्या सभेमध्ये विषय क्र.६८ अन्वये विचारार्थ ठेवण्यात आले होते. त्यावर अधिष्ठाता मंडळाने, विद्या परिषदेला केलेल्या शिफारशीवर क्र.१ ते ३ बाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ कलम १२० नुसार संलग्नीकरण काढून घेण्याबाबतची शिफारस विद्या परिषदेच्या दि.४.१२.२०२० रोजी झालेल्या सभेपुढे विषय क्र.५८ अन्वये विचारार्थ ठेवण्यात आली होती. त्यावर सभेने घेतलेल्या निर्णयाचे अनुषंगाने संबंधित संलग्नित महाविद्यालयामधील व्यवस्थापन मंडळाला दि. ५.२.२०२१ रोजी विद्यापीठामध्ये झालेल्या सुनावणीबाबतचा अहवाल व अधिष्ठाता मंडळाच्या शिफारशी दि.४.५.२०२२ रोजीच्या विद्या परिषदेच्या सभेतील विषय क्र.१८ अन्वये मान्य करण्यात आल्या. त्यानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ मधील कलम १२० मधील तरतुदीनुसार खालील तक्त्यामध्ये दर्शविलेले महाविद्यालये शैक्षणिक सत्र २०२१-२२ पासून बंद करण्यात येत आहेत.

आदेशान्वये.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव व सांकेतिक क्रमांक | महाविद्यालयातील अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | आशिर्वाद ट्रस्ट, रुक्मिणी नगर, अमरावती. | स्व.पंजाबराव उपाख्य नानासाहेब देशमुख महाविद्यालय, साई कमर्शीयल कॉम्प्लेक्स,राठी नगर,अमरावती. **(सांकेतिक क्र.१८४)** | बी.एस्सी. बी.सी.ए. बी.एफ.ए. बी.टेक |
| २. | पिपल्स वेल्फेअर सोसायटी, चिरंतन मधुबन कॉलनी, कॅम्प,अमरावती. | कॉलेज ऑफ सायन्सेस, मॅनेजमेंट ॲन्ड ह्युमॅनिटीज कठोरा नाका, व्ही.एम.व्ही. रोड,अमरावती. **(सांकेतिक क्र.८१४)** | बी.सी.ए., बी.बी.ए. |
| ३. | श्री.दुर्गामाता बहुउद्देशिय क्रिडा व शैक्षणिक संस्था,चिंचोली क्र.२ ता.दिग्रस जि.यवतमाळ | स्व.इश्वरभाऊ देशमुख विधी महाविद्यालय, दिग्रस जि.यवतमाळ **(सांकेतिक क्र.४६२)** | विधी (५ वर्षीय) |

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ